।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

दासराम ग्रंथमाला : पुष्प ४८

श्रीदासराममहाराज विरचित

# वायुलहरी - विवरण

## श्री. नारायण रघुनाथ देशपांडे

- प्रकाशक -

**श्री. रमेश गोपाळराव लाळे**
**श्री. मोहन दत्तात्रय बर्वे**

आवृत्ती पहिली    सांगली    इ. स. २०१३

▪ **प्रकाशक :**
श्री. रमेश गोपाळराव लाळे
'पुष्पज्योती' अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३,
विश्रामबाग, सांगली.
फोन : (०२३३) २३०१८५०

▪ **पुस्तक मिळण्याचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घर क्र. ८२७, श्रीराम निकेतन,
श्रीबापुरावजी केळकर वाडा,
गांवभाग, सांगली ४१६४१६.

▪ **प्रथम आवृत्ती : इ.स.२०१३**

▪ **मुद्रक :**
श्री प्रसाद ग्राफिक्स
तळमजला, चाफळकर कॉम्प्लेक्स,
गांवभाग, सांगली ४१६४१६.

▪ **प्रसादमूल्य : रू. ३०/-**

▪ **सर्व हक्क प्रकाशकाधीन**

**लेखकाचे मनोगत ...**

माझे सद्‌गुरु श्रीदासराममहाराज यांचे हातून विपूल असे, मौल्यवान असे पारमार्थिक रहस्यभेद करणारे लेखन झालेले आहे. अशा पारमार्थिक लेखनापैकी 'वायुलहरी' या शीर्षकाखालील असलेल्या अभंगांना एक वेगळेच महत्व आहे. याचे कारण म्हणजे ह्या अभंगामधून श्रीदासराममहाराजांच्या तत्वज्ञानाचे थोडक्यामध्ये सारच एकवटलेले दिसून येते.

वायुलहरीच्या तत्वज्ञानाप्रमाणे चैतन्याचे वारे हेच साऱ्या विश्वाचे कारण असून, तेच निसर्गात व मानवी देहात अंतर्बाह्य व्यापून राहिलेले आहे. अशा चैतन्याचा अनुभव घेऊन त्याच्याशी एकरूप होऊन जाणे आणि त्यामुळे शाश्वत सुखाचा लाभ करून घेणे, हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असून तेच त्याचे सर्वोच्च मूल्य आहे. येथे वायुसाधनाने बाह्य दृश्य व जड देह ह्याना बाजूस सारून वायुरूप परमात्म्यात एकरूप होऊन जावयाचे आहे.

या अभंगामधून ब्रह्म-माया, विश्वाची व जीवाची उत्पत्ति, साधन-साक्षात्कार, चिद्वायूचे स्वरूप इत्यादी विषयांचे थोडक्यात सूत्ररूपाने वर्णन आलेले आहे. असामान्य प्रगल्भता आणि ऋतंभरा प्रज्ञा ही वैशिष्ट्ये अभंग वाचताना जागोजागी जाणवतात. अशा या अभंगातील तत्वज्ञानाचा सामान्य परिचय पारमार्थिक जनाना व्हावा अशा हेतूने विवरण करण्याचा प्रयत्न केला आहे. बहुप्रसवता हा उच्च व अभिजात साहित्याचा गुण असल्याने ह्या अभंगांचे अन्य प्रकाराने विवेचन होऊ शकेल याची मला जाणीव आहे. विषय समजण्यास सोईचे होण्याच्या हेतूने, अभंगांचा अनुक्रम विषयानुसार घेतलेला आहे. अनुक्रमणिकेत विषयांची वर्गवारी स्थूलमानाने केली आहे.

प.पू. आण्णांचे सदैव असलेले प्रेमछत्र हीच माझ्या लेखनापाठीमागील प्रेरणा आहे. हे लेखन म्हणजे सद्‌गुरु दासराममहाराजांची सेवा होय. अशी सेवा करण्याची संधी मिळणे हे केवळ त्यांच्या कृपाप्रसादाचे फळ आहे. याबद्दल मला तिळमात्रही शंका नाही. ही अल्पसेवा त्यांनी मान्य करून घ्यावी अशी प्रार्थना आहे.

या लेखनाविषयी अभिप्राय दादांच्या अंतरंगातील मा.श्री.आपटेकाका, मा.श्री.प्रभूजी केळकर तसेच मा.श्री.दिपकजी केळकर यांनी व्यक्त केले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी माझे स्नेही श्री. रमेश लाळे व श्री. मोहन बर्वे यांनी उचललेली आहे. त्याबद्दल त्यांचे तसेच या पुस्तक छपाईचे काम सुबकरित्या केल्याबद्दल श्री. पटवर्धन यांचेही आभारी आहे. अखेर सद्‌गुरु निंबरगीकर महाराज व सद्‌गुरु दासराममहाराज यांचे चरणी शतशः दंडवत करून इथेच थांबतो.

**- नारायण देशपांडे**



# अनुक्रमणिका


| | विषय | अभंग क्रमांक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंजन ब्रह्म | ०१ ते ०५ | ०१ त० ५ |
| २. | चैतन्य/आत्मा | ०६ ते १४ | ०५ ते १५ |
| ३. | सृष्टिनिर्मिती | १५ ते २९ | १६ ते ३५ |
| ४. | भक्ती | ३० ते ३७ | ३६ ते ४६ |
| ५. | साधन-साक्षात्कार | ३८ ते ५६ | ४६ ते ७० |
| ६. | प्रार्थना | ५७ ते ६४ | ७१ ते ७९ |
| ७. | आरती | --- | ८० |

**वायुलहरीचे संदर्भात .....**

''ही वायुलहरी म्हणजेच ही विश्वलहरी आहे. संतांचे ठिकाणीच ही ध्वनित होत असते आणि मग या ध्वनिलहरींचे श्रवणही मोठ्या भाग्याचे ठरते.''

–श्रीदासराममहाराज

पूर्वजन्मी महायोगी असणाऱ्या आणि वयाच्या चौदाव्या दिवशी सद्गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचा अनुग्रह प्राप्त झालेल्या अधिकारसंपन्न अशा श्रीदासराममहाराजांना वयाच्या सातव्या वर्षीच 'आत्मयाची स्फूर्ती' झाली आणि त्यांचे हातून नाना प्रकारचे पारमार्थिक लेखन झाले. या आध्यात्मिक लेखनात ''वायुलहरी' हे छोटेसे प्रकरण आहे. या वायुलहरीच्या संदर्भात श्रीदासराममहाराज असे सांगतात,

''श्रीतात्यासाहेबांचे व श्रीमामांचे कृपेने भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे नातू श्रीसद्गुरु श्रीनागाप्पाण्णा महाराज यांचे वचनाप्रमाणे मिळालेल्या श्रीगुरुलिंगगीता प्रसादातून या अर्भकाचे अंतरी उत्स्फूर्त झालेली ही वायुलहरी आहे. आणि त्यानंतर 'हनुमंते कृपा केली। वायुलहरी बोलविली' असा प्रकार घडला.

श्रीदासराममहाराजांची ही वायुलहरी आत्तापर्यंत दोनदा प्रकाशित झाली होती. इ.स.१९६४ साली ती श्री.न. व्यं.पडसलगीकर यांनी आपल्या मातोश्रींच्या इच्छेप्रमाणे प्रकाशित केली होती. या वायुलहरीत ६७ पदे होती. पुढे जेव्हा श्रीदासराममहाराजांच्या अभंगांचा गाथा इ.स. १९८८ मध्ये प्रकाशित झाला तेव्हा त्यामध्ये ही वायुलहरी होती. गाथेमधील या वायुलहरीत ६४ पदे आहेत. ही ६४ पदे असणारी वायुलहरी मा. श्री. नारायणराव देशपांडे यांनी स्पष्टीकरण करण्यास निवडली. स्पष्टीकरण करताना त्यांनी गाथेतील वायुलहरीच्या पदक्रमांकात काही बदल केले. मा. नारायणराव देशपांडे हे दासराममहाराजांच्या कृपेतील असल्याने त्यांनी हे स्पष्टीकरणाचे कार्य केले आहे.

श्रीदासराममहाराज विरचित
वायुलहरी - विवरण

ज्या वायुविषयी श्रीदासराममहाराजांनी वायुलहरीत सांगितले आहे तो वायु म्हणजे जगातील जड/अचेतन वायू नव्हे हे अगदी स्पष्ट आहे. श्रीदासराममहाराजांना अभिप्रेत असणारा 'वारा चैतन्याचा' आहे. किंबहुना हा वायू चैतन्य आहे आणि तोच 'आमचा देव' आहे असे श्रीदासराममहाराज सांगतात. या वायूपासूनच 'जगताची लहर' उठली, हा वायू जग व्यापून राहिला आहे. तो जगात नाना प्रकारांनी आविर्भूत होऊन कार्य करीत आहे. हा वाराच मानवी शरीरातही आहे आणि मानवी शरीरातील वायूच्या साधनानेच गुरुकृपा होऊन चैतन्यरूप वायूचा साक्षात्कार होऊन चैतन्यरूप जीव हा चैतन्यरूप वायू होऊन मुक्त होऊन जातो.

या वायुलहरीतील पदांचे बरेचसे चरण कळण्यास सुलभ आहेत. पण काही ठिकाणी काही चरण कळण्यास कठिण वाटतात. उदाहरणार्थ शून्य हा शब्द वायुलहरीत अनेक पदात आला आहे. हा शून्य शब्द कोणत्या अर्थाने आला आहे हे कळणे आवश्यक आहे. तसेच या वायुलहरीत आलेले ''पीतप्रभेचा नीलप्रसाद' (पद क्रमांक १०), 'निर्गुणी झाले सगुण' (पद क्रमांक २४) तसेच 'सद्गुणाढ्य, सद्रुप धुंदी' (पद क्रमांक ४३) इत्यादी शब्दप्रयोगांचा नीट अर्थ कळणे आवश्यक वाटते. या अवघड भागासकट वायुलहरीतील पदांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न मा. नारायण देशपांडे यांनी केला आहे. त्याचे मोल वाचकांनीच करावयाचे आहे.

वायुलहरीचे स्पष्टीकरण केल्याबद्दल मा.नारायण देशपांडे यांचे अभिनंदन करून मी येथेच थांबतो.

**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

**प्रकाशकाचे मनोगत ...**

।। राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

''कैवल्याचा पुतळा । प्रगटला भूतळा ।
चैतन्याचा जिव्हाळा । ज्ञानोबा माझा ।।''

हे ज्ञानेश्वरांचे वर्णन आमच्या प.पू. दासराममहाराजांना उर्फ दादांना तंतोतंत लागू पडते. आमचे दादा कैवल्याचा म्हणजे मोक्षाचा पुतळा तर होतेच पण मूर्तिमंत चैतन्यच त्यांच्या रूपाने या भूतळावर प्रगट झाले होते. त्यामुळे चैतन्य हाच त्यांचा जिव्हाळा होता, जिव्हाळ्याचा विषय होता. अभंग, गद्य, पद्य रचना, ओवीबध्द टीका, निबंध, आरत्या, पदे अशा विपुल साहित्यनिर्मितीतून ती. दादांनी चैतन्याचे अंतर्बाह्य परिपूर्ण वर्णन केले. त्यांना स्फुरलेल्या दासरामगाथेतील 'वायुलहरी' हे एक ६४ अभंगांचे प्रकरण आहे.

भगवद्गीता ही जशी उपनिषदांचे सार आहे तशी 'वायुलहरी' ही प.पू.दासराममहाराजांच्या तत्वज्ञान, साधन, साक्षात्कार, अनुभवांचे सार आहे. साधकाचा जीव ते शिव व शिव ते निरंजन ब्रह्मस्वरूप होईपर्यंतचा प्रवास त्यांनी साधन, साक्षात्कार, अनुभव, गुरुभक्ती, शरणागती, विनवणी, प्रार्थना याद्वारे अभंगातून वर्णिला आहे. त्याचबरोबर सत्ब्रह्मापासून सृष्टिनिर्मितीची निर्मितीप्रक्रीयाही ठिकठिकाणी अभंगातून स्पष्ट केली आहे. ''तू मी मिसळू एकात । संपवोनी सारे द्वैत ।। जीवन हे करू अद्वैत । तेचि वाटे गोड रे । माझी ऐक विनवणी । कवाड दे उघडोनी । नेई निरंजनी झणी । दासराम झोंड रे ।।'' हे म्हणजे ती.प.पू. दासराममहाराज चिद्मधून सत्मध्ये विलीन होण्याच्या म्हणजेच 'सोहं तेही अस्तावले' या अवस्थेत असताना ही 'वायुलहरी' त्यांना स्फुरलेली आहे. त्यामुळेच ती साधकांना दुर्बोध झाली होती. तिचा खरा अर्थ उलगडून, समजून घेण्याच्या ध्यासातून आमचे परममित्र श्री. अरविंद उर्फ नारायणराव देशपांडे सतत वायुलहरीच्या अभ्यासाच्या म्हणजेच सद्गुरु दासराममहाराजांच्या अनुसंधानात राहिले व फलस्वरूप ती.प.पू. दादांच्या वायुलहरीचे विवरण ती. दादांनीच श्री. नारायणरावांना आपल्या कृपाप्रसादाने स्फुरविले आणि हे 'वायुलहरी विवरण' साधकांसाठी साकार झाले.

श्रीदासराममहाराज विरचित
वायुलहरी - विवरण

'वायुलहरी विवरण' करताना श्री. नारायणरावांनी निरंजन ब्रह्म, चैतन्य/आत्मा, सृष्टीनिर्मिती, भक्ती, साधन, साक्षात्कार, प्रार्थना अशी विषयांची मांडणी करून ती.प.पू. दासराममहाराजांचे ब्रह्मस्वरूपच ग्रंथरूपाने आपणापुढे मांडले आहे. वायुलहरी विवरणाचा हा पहिलाच प्रयत्न आहे. तो सर्व साधकांना व अध्यात्मप्रेमींना निश्चितच आवडेल व उपयोगी पडेल अशी खात्री आहे.

या ग्रंथाचे प्रकाशन करून ती.प.पू.दादांची म्हणजे चिमड संप्रदायाची अल्पस्वल्प सेवा करण्याची संधी मिळावी अशी विनंती ती.प.पू. सद्गुरु आण्णांकडे आम्ही व्यक्त करताच त्यांनी ती आनंदाने तत्काळ मान्य केली व आंम्हाला प्रकाशनसेवेची संधी मिळाली याबद्दल आम्ही ती. प.पू. आण्णांचे व श्री. नारायणराव देशपांडे यांचे ऋणी आहोत. या ग्रंथासाठी ती.डॉ. के. वा. आपटे सर, श्री. अनिलप्रभूजी केळकर, श्री. दीपकजी केळकर यांचे अभ्यासपूर्ण अभिप्राय व ती.प.पू.आण्णांचे आशीर्वाद लाभले आहेत. त्यामुळे 'आधी सोन्याचे, वरी जडावाचे' असे झाले आहे. याबद्दल या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

ग्रंथप्रकाशनाचे काम श्री प्रसाद ग्राफिक्सच्या श्री व सौ. पटवर्धन यांनी थोड्या अवधीत व अत्यंत सुबकपणे करून आम्हाला सहकार्य केल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. तसेच श्री. प्रसन्न गोखले यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहोत.

भविष्यकाळात अनेक जिज्ञासू, अभ्यासू , विद्वान साधक आपापल्या परीने ती.दादांच्या ग्रंथसंपदेचे विवरण-विवेचन करतील, त्यांना हा ग्रंथ निश्चितच उपयोगी पडेल.

अशीच सेवा आम्हांकडून अखंड करून घ्यावी अशी आम्ही भ.स.निंबरगीकरमहाराज, भ.स.कोटणीसमहाराज, भ.स.मामामहाराज, भ.स.दासराममहाराज व प.पू.सद्गुरु आण्णा महाराजांचे चरणी प्रार्थना करतो.

सांगली
दि.३-२-२०१३

**श्री. रमेश गोपाळराव लाळे**
**श्री. मोहन दत्तात्रय बर्वे**

## वायुलहरी विवरण गौरव

ती.प.पू.दासराममहाराज यांचे ठिकाणी या वायुलहरी ध्वनीत झालेल्या आहेत. या वायुलहरी ज्यांची वृत्ती संथ झालेली आहे, ज्यांनी अंतरातील भगवंत जाणलेला आहे, जे कल्पनातीत होऊन निर्विकल्प ब्रह्माचे ठिकाणी लीन झालेले आहेत, अशा संतांनाच ध्वनीत होतात. ज्यांचे अंतरी जागते ज्ञान आहे अशा साधु श्रीदासरामांनी प्रगट केलेली ही वायुलहरी म्हणजे जनावेगळ्या गोष्टी आहेत.

ही वायुलहरी म्हणजे 'आत्मयाची काव्यस्फूर्ती' आहे. साधनाचे अभ्यासाने नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण ११ अंगुळे झाले असता ही आत्मयाची काव्यस्फूर्ती होते. वयाच्या १९ व्या वर्षीच ही वायुलहरी त्यांना स्फुरली हेच केवढे विशेष आहे.

श्रीदासराममहाराजांचे दृष्टीने ही वायुलहरी म्हणजे विश्वलहरी आहे. श्रीसद्गुरुनागाप्पाण्णामहाराजांचे वचनाप्रमाणे त्यांचे ठिकाणी श्रुत झालेल्या श्रीगुरुलिंगगीताप्रसादातून ही त्यांचे ठिकाणी अंत:स्फूर्त झालेली आहे. अर्थात या वायुलहरीचे 'प्रेरक' श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजच आहेत. चैतन्याचा जिव्हाळा (स्त्रोत) अशा श्रीदासराममहाराजांचे ठिकाणी चैतन्याच्या वाऱ्याबद्दल जिव्हाळा (प्रेम) होते. तो अंत:करणातील जिव्हाळा प्रगट झाला, ती ही वायुलहरी. अशा वायुलहरीची महती काय वर्णावी.

ही वायुलहरी म्हणजे चैतन्याच्या वाऱ्याची केलेली स्तुती आहे. चैतन्याच्या वाऱ्याचे गुणवर्णन आहे. या विश्वाची निर्मिती एका चैतन्यापासून झालेली असून या विश्वात चैतन्याशिवाय कांहीच नाही आहे. या चैतन्याचा अनुभव कसा घ्यायचा, चैतन्याचे अनुभव कसे असतात आदी विषय या वायुलहरीत आलेले आहेत.

वायुलहरीतील विषय हा सारा अंतरंगातील विषय असल्याने त्याचा अर्थ सहजासहजी कळणे तसे अवघड आहे. या वायुलहरीचा अर्थ लोकांचेसमोर यावा या दृष्टीने, माझे मित्र श्री.नारायणराव देशपांडे यांनी 'वायुलहरी विवरण' लिहिले आहे. एकांतातील चिंतनातून हे 'वायुलहरी विवरण' साकारले आहे. वायुलहरीचे एकांतात चिंतन होणे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. श्रीमहाराजांची कृपा असल्याशिवाय या गोष्टी होत नाहीत, हे निश्चित.

श्रीदासराममहाराज विरचित
वायुलहरी - विवरण

वायुलहरीतील काही अभंग अत्यंत गूढ असल्याने त्यांचे विवरणही तसेच होणे स्वाभाविक आहे. या वायुलहरी-विवरणामुळे अध्यात्मप्रेमींना बऱ्याच गोष्टींची उकल होणारी आहे. त्यातील काही गोष्टींची झालेली उकल खालीलप्रमाणे,

१) मौनावस्था : चार देहांची चार व चार अवस्थांची चार अशी आठ शून्ये पार केल्यानंतर महाशून्याची प्राप्ती होते व हीच खरी मौनावस्था (अ.क्र.७)

२) विज्ञान अवस्था : महाकारणदेहातील अनुभवांची ज्ञानावस्था संपून त्यांची पूर्णावस्था म्हणजे विज्ञान अवस्था. (अ.क्र. ८)

३) चिद्गगन : निश्चळ तत्वातील चैतन्यलहरी प्रवाही होऊन चिद्गगन निर्माण होते. (अ.क्र. १३)

४) चिदाकाश : चैतन्यलहरीच्या प्रवाहामधील पोकळीला चिदाकाश म्हणतात. (अ.क्र.१५) चिदाकाश ही तूर्यावस्था होय. (अ.क्र.१९)

५) सगुण-निर्गुण : निश्चळ चैतन्य निर्गुण तर चंचळ चैतन्य सगुण (अ.क्र. २०)

६) प्राण : सहस्त्रदळी चैतन्याच्या स्पंदलहरी वाढत जाऊन त्यांना वायुचे स्वरुप येते त्याला प्राण म्हणतात. (अ.क्र. ३२)

हे वायुलहरी विवरण लिहून साधकांची मोठी सोय केल्याबद्दल श्री. नारायणराव देशपांडे यांना धन्यवाद देतो. अशीच वाङमयीन सेवा त्यांचेकडून व्हावी अशी प्रार्थना करतो. माझे मित्र श्री.रमेशराव लाळे व श्रीमोहनराव बर्वे यांनी हे 'वायुलहरी-विवरण' प्रकाशित करून साधकांची मोठी सोय केली आहे. त्यांना धन्यवाद देतो.

या वायुलहरी विवरणाचे चिंतनाने साधनाचे अभ्यासातील अडचणी दूर होऊन वायुलहरीचा खरा अर्थ मला व आपणा सर्वांना उमगावा अशी प्रार्थना भ.स.श्रीसमर्थ निंबरगीकरमहाराज, भ.स.साधुमहाराज, भ.स.रामचंद्रराव यरगट्टीकरमहाराज, भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, भ.स.श्रीमामामहाराज केळकर, भ.स.श्रीदासराममहाराज केळकर यांना करतो.

**अनिलप्रभू रामराय केळकर**

## 'वायुलहरी वायुसागरी मिनली'

माझे पितृदेव श्री.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांना स्फुरलेल्या वायुलहरी या प्रकरणातील पदांवर आमच्या श्रीदासराममहाराजांचेच कृपांकित श्री.नारायणराव देशपांडे यांनी विवरण लिहिले आहे. हेही त्यांना आमच्या श्रीदादांनीच स्फुरविले आहे असे वाटते. याचे मागे त्यांची श्रीदादांचेवर असलेली श्रध्दा/निष्ठा ही त्याला कारणीभूत आहे. यावर चार शब्द लिहिण्याचा माझा अधिकार नाही पण मी पण एक श्रीदादांचा असल्याने व श्री. नारायणराव देशपांडे यांनी फार आग्रह केल्याने श्री.दादांचे कृपेनेच हे चार शब्द लिहीत आहे.

या सगळ्या पदांच्यामध्ये 'वायुलहरी वायुसागरी मिनली' की ज्यामुळे या हरीची प्राप्ती, जोड, साक्षात्कार साधन करणाऱ्या साधकाला होईल असे सांगितले आहे.

हा सगळा विषय मला व माझ्यासारख्या व्यक्तींना अत्यंत उपयोगाला येणारा आहे. त्यामुळे आम्हा सर्वांचेवर श्री.नारायणराव देशपांडे यांनी फार मोठे ऋण केले आहे. या ऋणात राहिल्याने सगळ्यांच्यामधे एक आत्मभाव निर्माण होईल आणि तसा तो व्हावा अशी प्रार्थना माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज यांचे चरणी करतो.

शेवटी भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, भगवान श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.मामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी शतशः दंडवत घालून येथेच थांबतो.

।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ।।

श्रीदादांचा कृपाभिलाषी
**चंद्रशेखर**
**(चंद्रशेखर रामराय केळकर)**

सांगली
दि.३-२-२०१३




| | विषय | अभंग क्रमांक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| ४३. | वारा डोळुला कसा | ३९ | ४७ |
| ४४. | वारा उखळोनी उगाळिले | ४० | ४९ |
| ४५. | वाऱ्यावरी लागली नजर | ४३ | ५२ |
| ४६. | वारियाने वारा उडविला | ४४ | ५४ |
| ४७. | वारे कधी प्रगटेल | ५२ | ६३ |
| ४८. | वारियाची मौज किती | ५३ | ६४ |
| ४९. | वारा झालो मग | ५५ | ६७ |
| ५०. | विज्ञान आटले तेथे | ०२ | ०१ |
| ५१. | विश्व मालिकेचा ठसा | १३ | १३ |
| ५२. | सळ सळ सळ | २६ | ३० |
| ५३. | स्मरतो बा तुजला | ६१ | ७६ |
| ५४. | शब्द आकारिले विश्व | १८ | १९ |
| ५५. | शिव आत्मा तो | ०९ | ०८ |
| ५६. | श्वेत शाम दोनी | १५ | १६ |
| ५७. | शून्याची लहरी शब्द | ४२ | ५१ |
| ५८. | हरि भक्तीला शरण | ३७ | ४५ |
| ५९. | हनुमंते कृपा केली | ६४ | ७९ |
| ६०. | हा प्राण आटला | ३२ | ३८ |
| ६१. | हा वारा हा | ४५ | ५५ |
| ६२. | हे वारे जगी | ५४ | ६६ |
| ६३. | हंकाराचा शोध करी | २९ | ३४ |
| ६४. | ज्ञानदेवादी वारिया मिळाले | ६३ | ७८ |

**माझे मनीचे...**

जे चालते ज्ञानाचे बिंब । तयांचे अवयव ते सुखाचे कोंभ ।
येर ते माणूसपण भांब । लौकीक भागु ।।

– ज्ञानेश्वरी

या उक्तीप्रमाणे असणाऱ्या प.पू.श्रीदादांना वयाच्या ५ व्या वर्षी 'आत्मयाची काव्यस्फूर्ति' झाली व त्यांना 'गुरुचा पंखा असावा वरतीं ' हा पहिला अभंग स्फुरला. त्यानंतर वयाच्या ९ व्या वर्षी 'रामदासबोध' स्फुरला. त्यानंतर त्यांना बरीच काव्यस्फूर्ति झाली. वयाच्या २२ व्या वर्षी श्रीदादांना वायुलहरी स्फुरली. प्रथमत: श्रीदादांना अधिक जेष्ठ वद्य ८ शके १८६४, शनिवार दि.६/६/१९४२ रोजी एकूण १४ अभंग स्फुरले व त्यांनतर उरलेले अभंग स्फुरत गेले.

या अभंगांचे अवलोकन केले असता प.पू.श्रीदादांनी वारा हाच आपला देव आहे असे पटवून दिले आहे. परंतु हा वारा बाहेर वाहणारा वारा नव्हे. जो आपला श्वासोच्छ्वास आतबाहेर होत आहे तोच हा वारा आहे व तेच चैतन्य आहे. म्हणून प.पू.श्रीदादा म्हणतात, ''चैतन्याच्या वाऱ्या तुला माझा नमस्कार । तुझा नाद प्रकाश हाचि आम्हा साक्षात्कार ।।''

तसेच आणखी एका अभंगात श्रीदादा म्हणतात की, ''वारा हा मायबाप । हरवी जो त्रिविध ताप । विश्वाचा करी संकल्प । तो आत्मा या जगताचा ।।'' याचा अर्थ प.पू.श्री.आण्णा कीर्तनात सांगतात की,आपल्या आईवडिलांच्या ठिकाणी जर वारा नसता तर आपला जन्म झाला असता का ? किंवा जन्माला आलेले बाळ जर फूक होऊन (विना श्वासोच्छ्वास) जन्माला आले तर त्याचे बारसे कोणी करते का असा प्रश्न आहे. तसेच श्री. आण्णा सांगतात की या वाऱ्यातूनच विश्वाची उत्पत्ती झाली आहे. त्यामुळे या चैतन्यरूप वाऱ्याला आपल्या आयुष्यात

श्रीदासराममहाराज विरचित
वायुलहरी - विवरण

अनन्यसाधारण महत्व आहे.

ही वायुलहरीची पदे जर आपण नुसती वाचली तर याचा आपल्याला काहीसुध्दा बोध होत नाही. मला तरी होत नाही. त्यामुळे या वायुलहरीतील अभंगांवर मी चार शब्द लिहिणे म्हणजे हास्यास्पद गोष्ट आहे. परंतु श्रीनारायणराव देशपांडे यांचे माझेवर असणारे प्रेम व आपुलकी यामुळे मी हे चार शब्द लिहिणेचे धाडस केले आहे. श्री. देशपांडे यांनी या वायुलहरीतील एकूण ६४ अभंगांचा अत्यंत चांगल्या प्रकारे अर्थ केला आहे. तो अर्थ आपण वाचला असता, याचा अर्थ प.पू.श्रीदादांनीच त्यांना स्फुरविला असावा असे मला वाटते. प.पू. श्रीदादांवर असणारी त्यांची अत्यंतिक निष्ठा हेच त्याचे कारण आहे.

अशीच त्यांचे हातून प.पू.श्रीदादांची वाङमयीन सेवा घडत रहावी अशी प्रार्थना प.पू.सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, प.पू.सद्‌गुरु श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर, माझे पणजोबा प.पू.सद्‌गुरु श्रीमामामहाराज केळकर व माझे आजोबा प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी करतो व येथेच थांबतो.

''तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।
करुनि घेयावे हे तुमते । विनवितु असे ।।''

ज्ञानेश्वरी (१-८०)

**दिपक चं. केळकर**

सांगली
श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस पुण्यतिथी
दि.१-२-२०१३

## सूचि


| विषय | अभंग क्रमांक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. अशब्द हा सिंधू | १६ | १७ |
| २. अवचित नभी या | २१ | २२ |
| ३. अंतरी या बसुनी | ५८ | ७२ |
| ४. आदी वारे अंतीही | १९ | २० |
| ५. आत बाहेर वाहे | ५१ | ६२ |
| ६. आपुला सांगाती असता | ६० | ७५ |
| ७. ईवलीशी अशी लाट | ३५ | ४२ |
| ८. उघडिया डोळा अंधार | १७ | १८ |
| ९. केवळ आनंद सार | ०३ | ०२ |
| १०. कोण छेडी सूर | ५९ | ७३ |
| ११. चैतन्याच्या वाऱ्या तुला | ४७ | ५८ |
| १२. तेजाचा बंबाळ झगटला | १२ | ११ |
| १३. तूची मला सोड | ५७ | ७० |
| १४. थांबला दृष्टीचा चाळा | ४६ | ५७ |
| १५. धन्य आम्ही वायुपंथी | ३४ | ४१ |
| १६. ध्यास लागला वाऱ्याचा | १४ | १५ |
| १७. निखाऱ्यावरी हा वारा | ४७ | ५८ |
| १८. पाहू कोठे येते | ५० | ६१ |
| १९. पीत ब्रह्मीचे पहाणे | ०७ | ०६ |
| २०. पीत आत्मा शून्य | ०८ | ०७ |
| २१. पुरे पुरे तुझा | ०५ | ०४ |





| विषय | अभंग क्रमांक | पान क्रमांक |
|---|---|---|
| २२. मन चोर हरी | २२ | २३ |
| २३. मी वारा तू | ५६ | ६९ |
| २४. या गारा पाहू | २७ | ३१ |
| २५. रामकृष्णी शून्य पहाणे | ३८ | ४६ |
| २६. रामकृष्णी मन बुध्दी | ४१ | ५० |
| २७. रामकृष्ण शून्य जीवाची | ४९ | ६० |
| २८. लागला हृदयीच वारा | १० | ०९ |
| २९. वायुरुप निरंजना काय | ०१ | ०१ |
| ३०. वारा हा प्राणदाता | ०४ | ०३ |
| ३१. वायुघर्षणी या प्रभा | ०६ | ०५ |
| ३२. वायो प्रसन्न होई | ६२ | ७७ |
| ३३. वारे भरले या | ११ | १० |
| ३४. वारा पाहता जगी | २० | २१ |
| ३५. वायुलहरी या होऊनी | २३ | २५ |
| ३६. वारा वारा वारा | २४ | २७ |
| ३७. वारा पाहिला कोणी | २५ | २८ |
| ३८. वारा हा जगती | २८ | ३२ |
| ३९. वारा हा खुळा | ३० | ३६ |
| ४०. वारिया मिळाले ते | ३१ | ३७ |
| ४१. वाराची देव आमुचा | ३३ | ३९ |
| ४२. वारा माझा मी | ३६ | ४४ |

**वायुलहरीचे संदर्भात .....**

''ही वायुलहरी म्हणजेच ही विश्वलहरी आहे. संतांचे ठिकाणीच ही ध्वनित होत असते आणि मग या ध्वनिलहरींचे श्रवणही मोठ्या भाग्याचे ठरते.''

-श्रीदासराममहाराज

पूर्वजन्मी महायोगी असणाऱ्या आणि वयाच्या चौदाव्या दिवशी सद्‌गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचा अनुग्रह प्राप्त झालेल्या अधिकारसंपन्न अशा श्रीदासराममहाराजांना वयाच्या सातव्या वर्षीच 'आत्मयाची स्फूर्ती' झाली आणि त्यांचे हातून नाना प्रकारचे पारमार्थिक लेखन झाले. या आध्यात्मिक लेखनात ''वायुलहरी' हे छोटेसे प्रकरण आहे. या वायुलहरीच्या संदर्भात श्रीदासराममहाराज असे सांगतात,

''श्रीतात्यासाहेबांचे व श्रीमामांचे कृपेने भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे नातू श्रीसद्‌गुरु श्रीनागाप्पाण्णा महाराज यांचे वचनाप्रमाणे मिळालेल्या श्रीगुरुलिंगगीता प्रसादातून या अर्भकाचे अंतरी उत्स्फूर्त झालेली ही वायुलहरी आहे. आणि त्यानंतर 'हनुमंते कृपा केली। वायुलहरी बोलविली' असा प्रकार घडला.

श्रीदासराममहाराजांची ही वायुलहरी आत्तापर्यंत दोनदा प्रकाशित झाली होती. इ.स.१९६४ साली ती श्री.न. व्यं.पडसलगीकर यांनी आपल्या मातोश्रींच्या इच्छेप्रमाणे प्रकाशित केली होती. या वायुलहरीत ६७ पदे होती. पुढे जेव्हा श्रीदासराममहाराजांच्या अभंगांचा गाथा इ.स. १९८८ मध्ये प्रकाशित झाला तेव्हा त्यामध्ये ही वायुलहरी होती. गाथेमधील या वायुलहरीत ६४ पदे आहेत. ही ६४ पदे असणारी वायुलहरी मा. श्री. नारायणराव देशपांडे यांनी स्पष्टीकरण करण्यास निवडली. स्पष्टीकरण करताना त्यांनी गाथेतील वायुलहरीच्या पदक्रमांकात काही बदल केले. मा. नारायणराव देशपांडे हे दासराममहाराजांच्या कृपेतील असल्याने



वायुलहरीतील काही अभंग अत्यंत गूढ असल्याने त्यांचे विवरणही तसेच होणे स्वाभाविक आहे. या वायुलहरी-विवरणामुळे अध्यात्मप्रेमींना बऱ्याच गोष्टींची उकल होणारी आहे. त्यातील काही गोष्टींची झालेली उकल खालीलप्रमाणे,

१) मौनावस्था : चार देहांची चार व चार अवस्थांची चार अशी आठ शून्ये पार केल्यानंतर महाशून्याची प्राप्ती होते व हीच खरी मौनावस्था (अ.क्र.७)

२) विज्ञान अवस्था : महाकारणदेहातील अनुभवांची ज्ञानावस्था संपून त्यांची पूर्णावस्था म्हणजे विज्ञान अवस्था. (अ.क्र. ८)

३) चिद्‌गगन : निश्चळ तत्वातील चैतन्यलहरी प्रवाही होऊन चिद्‌गगन निर्माण होते. (अ.क्र. १३)

४) चिदाकाश : चैतन्यलहरीच्या प्रवाहामधील पोकळीला चिदाकाश म्हणतात. (अ.क्र.१५) चिदाकाश ही तूर्यावस्था होय. (अ.क्र.१९)

५) सगुण-निर्गुण : निश्चळ चैतन्य निर्गुण तर चंचळ चैतन्य सगुण (अ.क्र. २०)

६) प्राण : सहस्त्रदळी चैतन्याच्या स्पंदलहरी वाढत जाऊन त्यांना वायुचे स्वरुप येते त्याला प्राण म्हणतात. (अ.क्र. ३२)

हे वायुलहरी विवरण लिहून साधकांची मोठी सोय केल्याबद्दल श्री. नारायणराव देशपांडे यांना धन्यवाद देतो. अशीच वाङमयीन सेवा त्यांचेकडून व्हावी अशी प्रार्थना करतो. माझे मित्र श्री.रमेशराव लाळे व श्रीमोहनराव बर्वे यांनी हे 'वायुलहरी-विवरण' प्रकाशित करून साधकांची मोठी सोय केली आहे. त्यांना धन्यवाद देतो.

या वायुलहरी विवरणाचे चिंतनाने साधनाचे अभ्यासातील अडचणी दूर होऊन वायुलहरीचा खरा अर्थ मला व आपणा सर्वांना उमगावा अशी प्रार्थना भ.स.श्रीसमर्थ निंबरगीकरमहाराज, भ.स.साधुमहाराज, भ.स.रामचंद्रराव यरगट्टीकरमहाराज, भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, भ.स.श्रीमामामहाराज केळकर, भ.स.श्रीदासराममहाराज केळकर यांना करतो.

**अनिलप्रभू रामराय केळकर**